# ।। ॐ श्री साईराम।।
# प्रशांती संदेश - ८६

भगवान बाबांच्या चरणकमलांना वंदन

प्रशांती संदेशच्या ८६व्या भागाचा 'विकासासाठी प्रेम' हा विषय आहे. मी पुनरूच्चार करतो- 'विकासासाठी प्रेम.' होय! याविषयी मला काही विचार मांडू द्या.

प्रेम ही काही अनोळखी गोष्ट नाही. ती कुणालाही नवीन नाही. प्रेम ही नैसर्गिकपणे उचंबळून येणारी दैवी देणगी आहे. म्हणून मला प्रेमाबद्दल फार काही बोलायचे नाही, आपल्याला ते काय आते, ते माहीत आहे. आणि सर्व पातळ्यांवर ते काय असतं, तर ते मैत्री, आदर किंवा आसक्ती अशा पातळ्यांवरचे असू शकते. तुम्ही काहीही म्हणा, वेगवेगळ्या पातळ्यांवर प्रेमाचे ते रूप व्यक्त करता येते.

पण बहुतेक वेळी अशा प्रकारचे प्रेम आपल्या विकासासाठी मदत करत नाही. उलट अशा प्रकारचे प्रेम बंधनकारक ठरते. विकासाला-प्रगतीला अडथळाच ठरते. म्हणून आपण 'विकासासाठीच्या प्रेमाचा' विचार करावयास हवा.

सगळीकडे तीन प्रकारची विषे असतात. ती आपल्याला मारत नाही, पण त्यांच्याविषयी वाटणारं प्रेम हे जवळजवळ प्राणघातकच असतं. होय! आपण सत्तेवर प्रेम करतो. जे सत्तेवर प्रेम करतात, ते कसे वागतात हे आपल्याला माहीत आहे. ते किती वर्चस्व गाजवणारे असतात! ते दुसऱ्यांबरोबर कसे वागतात आणि मग प्रतिष्ठेसाठी प्रेम! काही लोकांना लोकप्रियता हवी असते, सामाजिक प्रतिष्ठा हवी असते. आपल्याला माहीत आहे की त्याकरता ते किती धडपडत असतात, ते त्याकरता किती हतबल होऊ शकतात! खरं सांगायचं तर ते किती दु:खी असतात. काही पैशावर प्रेम करतात, ठीक, ते कसे असतात ते आपल्याला माहीत असते. त्यांचा कोणावरही विश्वास नसतो, न संपणारी तृष्णा! म्हणून ते एक प्रकारचे विषच आहे. सत्तेसाठी, प्रतिष्ठेसाठी, पैशासाठीचे प्रेम- म्हणजे विषच! त्याविषयी शंकाच घ्यावयास नको.

आणि आपला दृष्टिकोनसुद्धा चुकीच्या मार्गावरून जाणारा असतो. आपण सर्व काही उपयोगाच्या दृष्टिकोनातूनच हिशेब करतो. एखादी व्यक्ती आपल्यासाठी किती आणि कशी उपयोगाची आहे हे पाहून मगच त्या व्यक्तीशी बोलतो. आपण काहीही गोष्ट करताना तिचा आपल्याला कसा आणि किती उपयोग होईल हे पाहतो. सर्व ओळखी, नाती यांच्याकडे ते किती उपयोगी पडतील अशा मोजमापानी पाहिली जातात. हे पुरेसे स्पष्ट आहे की माणसांकडे उपयोगाच्या दृष्टिकोनातून पाहिलं जाणं ही किती घृणास्पद, भीतीचे आहे. त्यांचा उपयोग कसा करता येईल अशा दृष्टिकोनातून पाहणं हे फार भयंकर आहे.

पण खरं म्हणजे, उपयोग हा वस्तूंचा करून घ्यायचा असतो, माणसांचा नाही. जेव्हा आपण माणसांची उपयोगाची वस्तू म्हणून किंमत करतो, तेव्हा आपण माणसाला वस्तूच्या पातळीवर आणतो. होय! तुम्हाला वस्तू हव्या असतील तर विकत घेता, तसंच माणसांना तुम्ही विकत घेण्याचा प्रयत्न करता हे फारच भयंकर आहे!

आपण स्वत:लाच विचारू या. आपण कसे आहोत? हो! पालकांनी, आपल्याला खूपच मदत केलेली असते. आज आपण जे काही आहोत, ते आपल्या पालकांमुळेच. आपण खरोखरीच त्यांचे आभारी असतो का? आपण त्यांना केवळ गृहित धरलेले असते. आपल्या मुलांवर प्रेम करण्यापेक्षा दुसरं काहीही ध्येय पालकांकडे नसते. तिथे फक्त 'गृहित' धरलं जाण्याचीच भावना असते. आपण मात्र त्यांच्याशी कृतज्ञ नसतो.

आणखी एक उदाहरण घ्या. गृहिणी किंवा पती, पत्नी किंवा पती कोणीही असो, त्यांचे कधी आभार मानतो का? एखादा पती, पत्नीचे आभार मानताना तुम्ही कधी पाहिले आहे का? एखादी पत्नी, पतीचे आभार मानताना तुम्ही कधी पाहिले आहे का? नाही. कारण पत्नी जे काही करते त्याचे आभार मानले पाहिजेत असे

मला वाटत नाही. नवरा किंवा पती माझी काळजी घेतो यात त्याचे आभार मानावेसे वाटत नाही. याचा अर्थ आपण एकमेकाला गृहित धरलेले असते. ही फारशी चांगली गोष्ट आहे असं वाटत नाही.

पण दुसरीकडे मात्र आपण इतर सर्वांचे, अपरिचितांचेदेखील आभार मानतो. जर माझा रुमाल खाली पडला आणि कोणीतरी तो उचलून  मला दिला, तर मी त्याचे आभार मानतो. पण माझ्यासाठी माझी पत्नी, जी खूप कामे करत असते, तिचे कधी आभार मानत नाही. ह्यात काहीतरी चूक होते आहे आणि आपल्याला ती सुधारली पाहिजे.

दुसऱ्या शब्दात असं की त्यांना आपण इतर वस्तूंच्या पातळीवर आणल्याकारणाने आपण त्यांना माणूस म्हणून वागणूक देत नाही. पण सत्य आहे की, आपण तर विचारशील असू तर वस्तूसुद्धा माणूस होऊ शकतात. वस्तू माणसंच होऊन जातात. मी तुम्हाला ते कसं सांगू? जेव्हा तुम्ही एखाद्या प्रतिमेची पूजा करता, तेव्हा त्याचा अर्थ काय असतो? त्या प्रतिमा आदर्शांमध्ये आणि तुमच्या पसंतीच्या देवांमध्ये परिवर्तित होतात. एखाद्या झाडाची पूजा का केली जाते? म्हणजेच आपल्या विचारी मनानी त्या वस्तूला, पदार्थाला आपण व्यक्तिमत्त्व बहाल करतो.

एकंदरित, आपण त्याकडे व्यक्तिमत्त्वाचया दृष्टीने पाहिले पाहिजे आणि मग परमेश्वराचे अस्तित्व सर्वत्र व्यापून राहिले आहे ह्या सत्याचा आनंद मिळेल. पण कीव करण्यासारखी गोष्ट म्हणजे आपण उडणाऱ्या माशीसारखे असतो. माशा उडून कुजलेल्या वस्तूंवर बसतात आणि आपण चांगल्या वस्तूंमधून बाहेर पडतो. आपल्याला चंदनाचे लाकूड नको असते. आपल्याला फूल आणि त्याचा सुगंध नको असतो, पण माशा मात्र कुजलेल्या मांसाच्या तुकड्याच्या दुर्गंधीकडे धावतात. म्हणजेच जीवन हे माशीसारखं असतं. आपण आपल्या भोवती असलेल्या मूल्यवान वस्तू टाळतो.

आणि आपल्याला असं कळून येतं की काही लोकांना आध्यात्मिक गोष्टी आजिबात आवडत नाहीत. त्यांना परमार्थात काहीच रुची नसते. कारण ते एखाद्या माशीसारखं जीवन जगतात, ज्या माशा सडलेल्या मांसाच्या तुकड्यावर, घाण वस्तूंवर बसतात. त्यामुळे जेव्हा आपण चांगल्या मौल्यवान वस्तू नाकारतो, तेव्हा आपले जीवन माशीसारखे होते.

आपल्याला तसे व्हायचे नाही. आपल्याला मोक्षाचा पाठपुरावा करायचा आहे, त्यापेक्षा काहीही कमी नको आहे. म्हणून आपण खरोखर मनापासून ध्यानधारणा केली आणि अजून खोलवर गेलो तर 'निर्वाण' स्थिती ही अगदी आपल्या दाराजवळच आहे, हे कळून येईल. तेथे मोक्ष सहजतेने मिळू शकतो. सखोल ध्यानधारणेमुळे हा अनुभव येतो.

आता इथे मी तुम्हाला एक उदाहरण देतो. आपल्याकडे भांडी आहेत आणि ती अन्नपदार्थांनी किंवा द्रवपदार्थांनी भरलेली आहेत. म्हणजे आपल्याकडे एक भांडं असतं व ते पदार्थांनी भरलेले आहे. आपण त्या पदार्थाकडे पाहतो पण भांड्याकडे पाहत नाही. ते पदार्थ म्हणजे बुद्धी किंवा मनासारखे आहेत. ते निरनिराळ्या विचारांनी भरलेले असते. पण भांडं हे वेगळंच असतं. ते जाणीवेने भरलेले असते म्हणजेच जाणीवेचा विचार करा आणि बुद्धी आणि मनाचा करू नका.

मग प्रश्न असा निर्माण होतो की आपलं डोकं कशाने भरलेलं असतं? भावना, राग, प्रेम, हव्यास, मत्सर, लोभ आणि काय नाही. पण एक गोष्ट नक्की आहे; ते लवकरच सुकूल जातील, नाहीसे होतील. ते फार काळ टिकणार नाहीत. दुसऱ्या शब्दात, ते आपल्या जीवनाला यंत्रवत बनवतात. आपलं जीवन म्हणजे एक यंत्रच बनवून टाकतात. पण बाहेरील भांड्याचे तसे नसते. तो वेगळा असतो. भांडं म्हणजे सावधपणाचे जीवन असते. त्यात अनंत, अमर्याद जाणीवा असतात. त्या जाणीवा म्हणजे भांड्यासारखं असते, त्या जाणीवा, किंवा सर्व गोष्टींचा समावेश करून घेणारं भांडं हे आपल्याहून, तुमच्याहून, माझ्याहून मोठं आहे हे आपल्याला माहीत

असलं पाहिजे.

स्वामींनी एक उदाहरण दिलं. मी एक फूल हातात धरलं आहे. मी फुलापेक्षा मोठा आहे. फूल मला धरत नाही, मी फुलाला धरत आहे. त्याचप्रमाणे परमेश्वर आपल्या सर्वांना तोलून धरत आहे. आपण त्याच्यापेक्षा लहान आहोत आणि हेसुद्धा लक्षात घेतलं पाहिजे की शरीरे ही भिन्न भिन्न आहेत. शरीराचा वेगळेपणा रंगरूपावर अवलंबून असतो. ते काहीही असो, पण जाणीवा, आत्मा हे एकच असून त्याला ऊर्जा म्हणतात.

सरतेशेवटी, आपण दूरदर्शनवर संगीताचा किंवा नृत्याचा कार्यक्रम पाहतो, तो त्या वाहिनीवर अवलंबून असतो. तुम्ही तुमच्या आवडीप्रमाणे बटन दाबून वाहिनी चालू करता आणि तुम्ही तो कार्यक्रम पाहू शकता. तसंच आकाशवाणीचंही आहे. पंखा फिरतो. होय! ही सर्व यंत्रे काम करतात ती सारख्या वीजप्रवाहामुळे काम करतात. तिथे काही बल्बचा वीजप्रवाह, दूरदर्शनचा वीजप्रवाह, पंख्याचा वीजप्रवाह असे वेगवेगळे वीजप्रवाह नसतात.

त्याचप्रमाणे शरीरे ही निरनिराळी असतात, पण आत्मा, जाणीव ही एकच आणि सारखीच असते. ही जाणीव पूर्णपणे स्पष्ट असते. ती इतकी विस्तारित, आकाशासारखी व्यापून टाकणारी, निरभ्र आणि स्वच्छ असते. त्या आकाशाने आपल्याला सर्वांना सामावून घेतले आहे. आपण सर्व जिवंत असतो आणि पूर्णपणे एकत्रित असतो.

आणि त्या एका आकाशाखाली, जिथे आपण जगतो, त्याचे आकलन होणे हे वैश्विक अनुभूतीच्या बरोबरीचे असते. जेव्हा तुम्ही त्या दृष्टिकोनातून पाहता, तेव्हा तुम्ही सामान्य माणूस नसता, तर तुम्ही वैश्विक व्यक्ती असता.

जेव्हा आपल्यात संपूर्ण आणि ठाम जागरुकता असते, तेव्हाच हे शक्य आहे. जेव्हा आपण सर्वजण वैश्विक माणसं आहोत, साध्या व्यक्ती नाहीत, हे ओळखण्याच्या, उमगण्याच्या उच्च पातळीवर जाण्याची शक्यता आहे. म्हणून आपल्या सर्वांना वैश्विक व्यक्ती होण्यासाठी ध्यानधारणेचा खूप उपयोग होईल. ध्यानधारणेमुळे आपण सर्वजण एकत्र येऊ आणि आपल्याला ते अनुसरता येईल.

इथे मी तुम्हाला आणखी एक उदाहरण देतो. एखादा व्याख्याता भाषण देत आहे, आपण त्याचे भाषण तल्लीन होऊन ऐकत आहोत. तिथे काय घडत असतं? व्याख्याता बोलत असताना, स्वत:ला विसरून जातो, श्रोतेही देहभान विसरलेले असतात. ते त्या विषयाशी समरस झालेले असतात. ते व्याख्यात्याच्या विषयाशी एकरूप झालेले असतात. तिथे आता श्रोतृवर्ग राहत नाही, भाषण देणारा राहत नाही. तिथे फक्त आणि फक्त विषयच असतो. तो विषयच फक्त उरतो. ह्या स्थितीला वैश्विक जाणीव, विश्वभावना असं म्हटलं जातं.

आपण एखादे भाषण किंवा संगीत शरीराने ऐकत नाही, नाहीच! आपण कोणतीही गोष्ट 'मन ऐकतंय' असं म्हणून ऐकत नाही. 'मी'पणाच्या भावनेनंसुद्धा नाही. आपण फक्त जाणीवेचा एक भाग म्हणून श्रोते असतो, हे आपल्याला लक्षात ठेवलं पाहिजे. आपण जेव्हा जाणीवेचा एक भाग म्हणून ऐकत असतो, तेव्हा काय घडत असतं? आपण भोगासक्तीकडून उदात्ततेच्या उंचीवर जातो, वस्तूकडून मनाकडे जातो. स्वाभाविकपणे आपण बेसावधपणाकडून, सावधपणाकडे (अजाणतेकडून जाणीवेकडे) प्रवास करतो. हे सर्व असे आहे!

जीवन ही एक शिडी आहे. या शिडीवरून वर चढायचं की खाली उतरायचं हे तुम्हालाच ठरवायचं असतं. जेव्हा तुम्ही खाली उतरता, तेव्हा तुमचा नाश ठरलेला असतो. तुम्ही जेव्हा वर चढून जाता, तेव्हा तुम्ही उच्च पातळीवर जाऊन पोहोचता. उत्क्रांत होणं म्हणजे शिडी चढून वर जाणं. जेव्हा तुम्ही पायऱ्या उतरता, तेव्हा तुमचा नाश ठरलेलाच असतो. यालाच आपण उन्नती, उत्क्रांती, उन्नयन असे म्हणतो.

ह्या खोलवर असलेल्या जाणीवेमध्ये कोणतीच वर्गवारी नसते. ती फक्त मानवातच असते असं नाही, पण मानवाला जागृतीची वरचर पातळी प्राप्त झालेली असते. पण खडकांमध्ये खोलवर गेलेल्या नेणीवा लक्षात

येतात. संपूर्णतया जाणीवा असणं ही दैवी देणगी आहे. देवत्व आणि भौतिक वस्तुस्थिती ह्यात हाच फरक आहे. भौतिक वस्तुस्थिती म्हणजे जाणीवांची पूर्ण उणीव असणं, तर देवत्व म्हणजे संपूर्णतया जाणीव असणं.

म्हणून शरीर आणि मन ह्यात कधी गोंधळ नसतो. आपण देहावर प्रेम करतो, तसंच मनावरही प्रेम करतो. आपण मनापासून प्रेम करतो, पण हे प्रेम खोलवर जाते, तेव्हा ते निर्मिती करते. शरीर आणि मन हे माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचे फक्त अवयव, भागच नसतात, पण शरीर हे एक मंदिर आहे असं म्हटलं गेलं आहे की देह हा देवाचे मंदिर आहे, देवालय आहे. म्हणजेच क्षेत्र आहे.

म्हणून प्रेम हे व्यक्तिसापेक्ष होऊ शकत नाही, ते केवळ व्यक्तिविशेषावर करता येत नाही. तसे करू नये. प्रेम हे संपूर्णपणे स्वतंत्र असते. ह्या संपूर्ण स्वातंत्र्यामध्येच प्रेम असते. मग ते शारीरिक प्रेम हे अशारीरिक होते. ही एक प्रकारची उन्नतीच आहे, ती ठराविक पातळीवरची उत्क्रांती आहे.

उदाहरणार्थ, समुद्र हा खारट पाण्याने भरलेला आहे, पण जेव्हा त्यावर सूर्यप्रकाश पडतो, तेव्हा ते पाणी ढगांमध्ये परिवर्तित होते. हे ढग पाऊस पाडतात, त्याचे थेंब जमिनीवर पडतात आणि हे थेंब मात्र गोड्या पाण्याचे असतात. खाऱ्या पाण्याचे गोड पाण्यात परिवर्तन होते. इथे ढग म्हणजे समाधी असते. समाधीचे ढग हे ध्यानधारणेने होतात.

हे समाधीचे ढग कसे तयार होतात? तुमच्या मनातील विचार दूर करा, तुमच्या मनातील इच्छा, आशा, आकांक्षा सोडून द्या. तुमच्या महत्त्वाकांक्षा विसरा, तेव्हा समाधीचे ढग तयार होतात आणि हे सर्व कसं होतं? ज्याप्रमाणे सूर्याच्या उष्णतेने समुद्राच्या पाण्याची वाफ होते, तसेच. आपल्या प्रत्येकाच्या शरीरात एक प्रकारचा ज्वलंत अग्नी आहे. हा अग्नी म्हणजे काय असतं? तर जाणीव! तर ही जाणीव म्हणजे ज्वलंत अग्नी आहे. आणि हा अग्नी ह्या पाण्याचे ध्यानधारणेच्या ढगांमध्ये परिवर्तन करतो. ही प्रक्रिया चालू असताना सर्व विचार, इच्छा, आकांक्षा आणि इतर भौतिक विषय नाहीसे होतात.

किती आश्चर्याची गोष्ट आहे ही! यानंतर काय होतं? प्रेम हे साधं-सोपं प्रेम राहत नाही. ते उच्च पातळीवरच्या अनुकंपेमध्ये बदलते. अनुकंपा! आणि ही स्थिती शब्दामध्ये वर्णन करता येत नाही कारण ती उत्युच्च पातळीवरची अनुकंपा असते. अवर्णनीय! अवर्णनीय म्हणजे वर्णन करण्यापलीकडची असते.

आणि मग आपल्याला आणखी एक प्रश्न पडू शकतो, तो म्हणजे एखाद्याकडे किती अनुकंपा आहे हे कसे समजणार? तिची चिन्हे काय असतात. दयाभावना असलेला माणूस नेहमीच समाधानी असतो. त्याचे जीवन हे त्याचे समाधान असते. कोणत्याही परिस्थितीत तो निराश नसतो. आपल्याला त्याच्या आयुष्यामध्ये निरामय शांतता, चित्ताची स्थिरता दिसते आणि तो आपल्या कल्पनेपेक्षा अधिक आनंद अनुभवत असतो.

इथे एक प्रश्न किंवा विचारात घेण्याचा मुद्दा आहे. तुम्ही सुखाचा विचार करू शकता कारण काही काळापूर्वी सुख अनुभवलेलं असतं. तुम्ही दु:खाचा अनुभव घेतलेला असतो, म्हणून सुखाचा विचार करू शकता. त्यामुळे सुख आणि दु:ख याचा विचार करता येतो, होय, कारण ते अनुभवलेले क्षण असतात. त्याची चांगल्या रीतीने, प्रकारे विचार करू शकतो पण आनंदाची मात्र कल्पना करता येत नाही, कारण आनंद हा कल्पना नसून, तो जीवनाचा भागच आहे. त्यामुळे आनंद हा काल्पनिक नसून तो तुमचे जीवनच आहे. आणि तेच तुमचं जीवन आहे. तुम्हीच आनंदस्वरूप आहात. आनंद हा परमात्मा आहे. तुम्हाला त्याचे स्वप्न पाहता येत नाही, पण आनंदाची दृष्टी असू शकते.

स्वप्न पाहणं आणि दृश्य पाहणं ह्यात फरक आहे. स्वप्न तुमचं असतं, पण दृश्य मात्र दैवी असतं. स्वप्न हे तुमची कल्पना असते, जी तुम्ही स्वत: निर्माण केलेली असते. एक विलक्षण कल्पना! पण दृश्य हे दैवी असतं. स्वप्नं ही मानसिक असतात. तर दृश्य हे आध्यात्मिकतेने सुचलेले असते. हे आपल्याला समजून घेतलं पाहिजे.

आणि इथे भगवान श्री सत्यसाईबाबांची गुरू म्हणूनची भूमिका स्पष्ट होते. त्यांच्या सर्व शिकवणुकींची तत्त्वे ही आपल्या हृदयाच्या क्षेत्रात पेरलेल्या बीजांप्रमाणे असतात. ती बीजे आज ना उद्या, एक दिवशी खात्रीने अंकुरतील. ह्याचा अर्थ असा की माझ्यामध्ये अदृश्य रूपाने असलेला खरा माणूस, सत्यस्वरूपात प्रकट होतो. सत्य स्वरूपात येतो म्हणजे तो आतापर्यंत प्रेमाच्या आवरणाखाली असतो आणि नवीन माणूस आकाराला येतो. नवीन माणूस हा खरा माणूस नव्याने जन्माला आलेला नसतो. जेव्हा प्रेम हे अनुकंपेत रुपांतरित होतं, तेव्हा आपण परिपक्व झालेले असतो. आपण समजदार झालेलो असतो, एखाद्या कळीतून पूर्ण विकसित झालेल्या फुलाप्रमाणे! आणि ह्यातूनच जाणीव व जागरुकता अशी फळे मिळतात.

म्हणून आपल्याला खालच्या पातळीवर न जाता, उच्च प्रतीला जाण्यासाठी, उन्नती होण्यासाठी प्रेम केलं पाहिजे. सरतेशेवटी आपण शरीर, मन, अहंकार यांच्याबरोबर जगत असतो. आणि त्याच वेळेस, हे विश्व म्हणजे काहीही नाही असा विश्वास असलेले काही लोक राहत असतात. आपण हे विसरतो की आपणही सत्ता, प्रतिष्ठा आणि संपत्ती यांच्यामागे धावत असतो. हे सर्व दुसरं काही नसून विषच आहे.

म्हणून प्रेम एक सामान्य गोष्ट, जशी शिडीवरील सर्वात खालच्या पायरीसारखी गोष्ट आहे. पण जेव्हा तुम्ही वरच्या पायऱ्या चढून जाता, तेव्हा प्रेमाचं अनुकंपेत रुपांतर होतं. शारीरिक प्रेम हे आध्यात्मिक प्रेम होते. प्रत्येक गोष्टीला दैवी व्यक्तिमत्त्व लाभते.

धन्यवाद!

***